परिशिष्ट

(नमुना२)

जाक्र/शिविप्रा/खाशा/शाळामान्यता/ 2602 /२०२३
कार्यालय,शिक्षण विभाग (प्राथ),जि.प.वाशिम.
दिनांक :- 08/08/2023

दुरध्वनी : ०७२५२ २३१०५२

ई मेल : ssawashim@yahoo.com

प्रति,

व्यवस्थापक
पोद्दार इंटरनॅशनल स्कुल सर्व्हे नं.११६ झाकलवाडी अकोला रोड वाशिम

**विषय :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २००९ च्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ,बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम ११ पोटनियम (४)अन्वये शाळांना आर.टी.ई.मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपल्या दिनांक १३.४.२०२३ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे ,

मी , शिक्षणाधिकारी प्राथमिक , जिल्हा परिषद,वाशिम **०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२५** या कालावधीसाठी **इयत्ता ०१ ते ०८** करीता **पोद्दार इंटरनॅशनल स्कुल सर्व्हे नं.११६ झाकलवाडी अकोला रोड वाशिम** या शाळेस आर.टी.ई.मान्यता देत आहे.

***वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे:***

१) ही मान्यता पुढे वाढणार नाही

२) शाळा,बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ (सहपत्र १ )आणि बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ (सहपत्र २ )च्या तरतुदींशी बांधील राहील.

३) शाळा इयत्ता १ ली मध्ये मान्य विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के शेजारच्या परिसरातील दुर्बल घटकांतील आणि प्रतिकुल गटातील बालकांना प्रवेश देईल आणि त्यांचे प्राथमिक शिक्षणपूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत शिक्षण देईल.हाच निकष पूर्वप्राथमिक वर्गात प्रवेश देतांना पाळाला जाईल.

४) परिच्छेद ३ मध्ये नमूद बालकांच्या खर्च कलम १२ (२) प्रमाणे प्रतिपुर्तता केली जाईल.अशा प्रतिपुर्तिसाठी शाळा स्वतंत्र बँक खाते उघडेल.

५) शाळा/संस्था प्रवेशासाठी कोणत्याही प्रकारे,कॅपिटेशन फी आकारणार नाही आणि बालक अथवा पालकांना छाननी प्रक्रियेची सक्ती करणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाचा दाखला नाही म्हणून शाळा प्रवेश नाकारणार नाही,अथवा लिंग,धर्म,जात,जन्म ठिकाण या कारणांवर प्रवेश नाकारणार नाही.

७) शाळा पुढील बाबींची दक्षता घेईल :

एक) कोणतेही बालक कोणत्याही वर्गात नापास/थोपविले जाणार नाही अथवा त्याचे प्राथमिक शिक्षणपूर्ण होईपर्यंत शाळेबाहेर हाकलले जाणार नाही.

दोन ) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा होणार नाही वा मानसिक छळ केला जाणार नाही.

तीन ) प्राथमिक शिक्षणपूर्ण करणाया प्रत्येक बालकांस सार्वजनिक बाहय परीक्षेस उत्तीर्ण होण्याची अट असणार नाही.

चार ) प्राथमिक शिक्षणपूर्ण करणाया प्रत्येक बालकांस नियम २३ खाली विहीत केलेले प्रमाणपत्र दिले जाईल.

पाच ) अधिनियमांच्या तरतुदीनुसार अपंग/विशेष गरजा असणारे बालकांचा समावेश केला जाईल.

सहा ) अधिनियमांच्या कलम २३ (१) मध्ये विहीत केल्यानुसारच किमान शैक्षणिक अर्हता असलेल्या शिक्षकांचीच नेमणूक केली जाईल.पुढे असे की ज्या शिक्षकांनी या अधिनियमांच्या अंमलबजावणी तारखेस जर किमान अर्हता प्राप्त केलेली नसेल तर ५ वर्षांच्या कालावधीत ते विहीत किमान अर्हता संपादन करतील.

सात ) शिक्षक कलम २४ (१) नुसार विहीत कर्तव्ये पार पडतील.

आठ ) शिक्षक खाजगी शिकवण्या घेणार नाहीत.

८) उचित प्राधिकरणाने विहीत केलेला अभ्यासक्रम अमलांत आणेल.

९) कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध सोयीच्या प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल.

१०) शाळा कलम १९ मध्ये विहीत सर्व निकष,मानके याप्रमाणे सर्व बाबींचा दर्जा ठेवेल.मागील तपासणी अहवालानुसार शाळेत उपलब्ध सोयीचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | शाळा परिसराचे क्षेत्रफळ | ८३६१.२७ चौ.मी. |
| २ | एकूण बांधकाम | १५२२ चौ.मी. |
| ३ | क्रिडांगणाचे क्षेत्रफळ | ३५३० चौ.मी. |
| ४ | वर्ग खोल्या संख्या | १४ |
| ५ | मुख्याध्यापक/कार्यालय /स्टोअरसाठी खोली | आहे |
| ६ | मुले व मुलींसाठी स्वंतंत्र स्वच्छतागृह | आहे |
| ७ | पिण्याच्या पाण्याची सोय | आहे |
| ८ | मध्यान्ह भोजन शिजविण्यासाठी स्वयंपाकघर | लागु नाही |
| ९ | अडथळाविना प्रवेश /वावर/सुविधा (RAMP) | आहे |
| १० | अध्ययन अध्यापन साहित्य /क्रिडा साहित्य /वाचन साहित्य | आहे |
| ११ | विद्युतीकरण | आहे |
| १२ | संरक्षकभिंत/तारेचे कुंपण | आहे |

११) मान्यता नसलेले वर्ग तुकडया शाळेत अथवा शाळेच्या नावाखाली परिसराबाहेर चालविले जाणार नाहीत .

१२) शाळा इमारत व इतर बांधकामे केवळ बालकांच्या शिक्षण/कौशल्य विकास या करीताच वापरात राहील .

१३) शाळेचे संचालन सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट (१८६०चा २१) किंवा मुबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० नुसार केलेले असेल .

१४) शाळा कोणा एका व्यक्तीच्या , गटाच्या किंवा व्यक्तीसमुहाच्या किंवा अन्य फायदयाकरीता चालविली जाणार नाही .

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून तपासले जातील. लेखापरिक्षण केले जातील आणि नियमानुसार योग्य असे लेखा तक्ते तयार केले जातील आणि नियमानुसार योग्य असे लेखा तक्ते तयार केले जातील . त्यांची एक प्रत जिल्हा शिक्षणाधिकायाकडे दरवर्षी पाठवावी लागेल.

१६) शाळेला **२७०६०६०६८०२** हा मान्यता संकेतांक दिला आहे.त्याची नोंद घ्यावी व पुढील पत्रव्यवहारात त्याचा वापर न चुकता करावा .

१७) शाळा या अधिनियमाची उत्तरदायित्व पूर्ण करण्यासाठी आणि सतत मान्यतेच्या अटी पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते अहवाल माहिती शिक्षणसंचालक /जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी मागितल्यानुसार पुरविली आणि राज्य सरकार /स्थानिक प्राधिकरण यांच्या आदेशाचे पूर्ण पालन करील.

१८) शाळेच्या संचालका संदर्भात सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था नोदणी नियम १९५० अंतर्गत नुतनिकरण केल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

१९) इतर अटी परिशिष्ट नमुना (३) प्रमाणे सोबत जोडले आहे.

२०)शिक्षण विभाग महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी लागेल तसेच विभाग मागील ती माहिती वेळोवेळी पूरवावी लागेल.

9-10-23

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, वाशिम

**प्रतिलीपीः-**

गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती वाशिम यांना माहिती करीता रवाना.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, वाशिम